वर्ष-०८ अंक-०८ मुंबई, मंगळवार ११ ते १७ जानेवारी २०२२ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
गुलाबी थंडीत मॉर्निंग वॉकचं निमित्त वाळू उपसा करणाऱ्या तस्करांना अधिकाऱ्याने शिकवला धडा

3 → लैंगिक छळाची बळी तरुणीलाच पोलिसांनी बनवले चक्क दरोड्याचे आरोपी

गॅसच्या भडक्याने काचा फुटल्या, दरवाजा तुटला, 6 जण होरपळले! ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## कर्मचारी कामावर आल्यावर कारवाई नाही

***कृती समितीसोबतच्या बैठकीनंतर अनिल परब यांचा मोठा निर्णय***



गेल्या दोन महिन्यांपासून सुरु असलेल्या राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी पुढाकार घेतला आहे. सोमवारी शरद पवार आणि राज्याचे परिवहनमंत्री अनिल परब यांची २२ कर्मचारी संघटनांच्या कृती समितीसोबत सह्याद्री अतिथीगृहावर बैठक पार पडली यावेळी अनिल परब यांनी आतापर्यंत कारवाई न झालेले कर्मचारी कामावर परतले तर त्यांच्यावर कारवाई होणार नाही अशी प्रतिक्रिया बैठकीनंतर दिली आहे.

शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली एसटी कर्मचाऱ्याच्या कृती ...पान २ वर...

## भारतातील सर्वात मोठ्या मावळ्या कडून मुंबईतील पहिल्या 2 किमी बोगद्याचं काम पूर्ण

## मुख्यमंत्र्यांकडून शाबासकी





मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील प्रियदर्शनी पार्क ते गिरगांव चौपाटी या पहिल्या बोगद्याचे खोदकाम पूर्ण झाले. भारतातील सर्वात मोठ्या 'मावळा' या टिबीएम संयंत्राच्या सहाय्याने आज हे काम पूर्ण झाले. या यंत्राने २.०७० किलोमीटर लांबीच्या पहिल्या बोगद्याचे काम पूर्णत्वाला नेले. या बोगदा खणन कामाचा 'ब्रेक थ्रू' सोमवारी (१० जानेवारी) गिरगाव चौपाटी येथे पार पडला. या कार्यक्रमास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. त्यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी या कामाबाबत शाबासकी दिलीय. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, "शाब्बास, उत्तम काम करत आहात. "मावळा" या शब्दाला साजेसे काम हे यंत्र आणि यंत्र हाताळणारे माझे सहकारी करत आहेत. स्वप्नं प्रत्यक्षात आणणं कठीण असतं, पण मुंबईकरांचे हे स्वप्नं पूर्ण करण्याच्या ध्यासाने काम करणाऱ्या माझ्या टीमचा मला अभिमान आहे. या मावळ्याच्या कामाचा शुभारंभ केलेला दिवस आठवतो. तेव्हा आपण कामाचा टप्पा कधी आणि कोणत्या काळात पूर्ण करू हे सांगितले होते." "बोगद्याची दोन टोकं समुद्राखालून जोडण्याचं काम आव्हानात्मक होतं" ...पान २ वर...

## महापौर ॲक्शन मोडमध्ये

***गेट वे ऑफ इंडिया परिसरात पाहणी दौरा, मास्क न घालणाऱ्यांना किशोरी पेडणेकरांनी झापलं***



मुंबई, मुंबईसह महाराष्ट्रात कोरोना बाधितांच्या आकडेवारी दिवसेंदिवस रेकॉर्डब्रेक नोंद होताना दिसत आहे. वाढत्या कोरनाच्या संसर्गाला आळा घालण्यासाठी राज्य सरकारकडून कठोर पावलं उचलण्यात येत असून आता राज्यात निर्बंध लागू करण्यात आले आहेत. नवे निर्बंध 10 जानेवारीच्या मध्यरात्रीपासून लागू होणार आहेत. त्यात दरम्यान मुंबईतील परिस्थितीचा आढावा घेण्यात येत आहे. मुंबईच्या महापौर किशोरी ...पान २ वर...

## केंद्रीय आरोग्यमंत्र्यासोबत दोन तास बैठक ; राजेश टोपेंनी माध्यमांना दिली ही माहिती, म्हणाले

देशात करोना महामारीची तिसरी लाट आल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर आज पाच राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील करोना संसर्गाच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांनी दुपारी साडेतीन ते साडेपाच अशी दोन तास विशेष बैठक घेतली. या बैठकीनंतर राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी माध्यमांना माहिती दिली. आरोग्यमंत्री राजेश




टोपे यांनी सांगितले की, "आज केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडवीय यांच्यासोबत दोन तास संपूर्णता पाच राज्यांचा आढावा झाला. त्यांनी काही माहिती दिली, या माध्यमातून राज्यांना काय काय अडचणी आहेत आणि काय काय केलं पाहिजे? याबाबत अपेक्षा व्यक्त केल्या. आजची परिस्थिती आम्ही त्यांना देखील सांगितली व जनतेला देखील सांगू इच्छित आहे की, ...पान २ वर...

### Spoof Payatm App

## पैसे देण्यासाठी फेक पेटीएम ॲपचा वापर, 50 हजार दिल्याचा बनाव करुन काढला पळ, तिघांना बेड्या

मुंबई : मुंबई परिसरातील साकीनाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेटीएमसारख्या बनावट ॲपच्या माध्यमातून एका हॉटेल मालकाची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पेटीएम ॲपसारखे दिसणारे Spoof Payatm app या ॲपमधून हॉटेलचे तब्बल 50 हजार रुपयांचे बील देऊन पळ काढण्याचा प्रयत्न एका टोळीने केलाय. मात्र हॉटेल मालकाच्या तक्रारीनंतर अवघ्या काही तासांत साकीनाका पोलिसांनी तीन जणांना बेड्या ठोकल्या आहेत.बनावट ॲपमधून 50 हजार रुपयांचे भाडे दिले

मिळालेल्या माहितीनुसार साकीनाका पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील एका हॉटेलमध्ये तीन लोक भाड्याने राहण्यासाठी आले होते. या तीन लोकांनी



अलिशान अशा तीन खोल्या बुक केल्या होत्या. या दिवसांत रुमचे एकूण 50 हजार रुपये भाडे झाले. नंतर हॉटेलमधून निघताना त्यांनी हॉटेल मॅनेजरला Spoof Payatm app ॲपमधून 50 हजार रुपये देऊ केले. तसेच या टोळीने येथून पळ काढला. फसवणूक झाल्याचे हॉटेल मालकाच्या लक्षात आले मात्र, जेव्हा हॉटेल मालकाने याबाबत बँकेत चौकशी केली. तसेच मालकाने यूट्यूबवर Spoof Payatm app या ॲपबद्दलची माहिती पाहिली. त्यानंतर मात्र आपली फसवणूक झाल्याचे हॉटेल मालकाच्या लक्षात आले. त्यानंतर हॉटेल मालकाने थेट साकीनाका पोलीस ठाणे गाठले. तसेच घडलेल्या प्रकाराची सविस्तर माहिती दिली.


तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या दाखल तक्रारीनुसार साकीनाका पोलिसांनी तपास सुरु केला. पोलिसांनी आरोपींचे मोबाईल लोकेशन ट्रेस करून अवघ्या दोन तासांमध्ये या तिघा आरोपींना बेड्या ठोकल्या. मोहम्मद खलील उर्फ अनस अब्दुल कलाम शेख वय 23 वर्षे, इब्राहीम समसुद्दिन काजी वय 27 वर्षे, आयुष सुहास ...पान २ वर...

## प्लास्टिक पिशवी कारवाईसाठी गेलेल्या पथकावर कांदे फेकले, कल्याणच्या एपीएमसी मार्केटमधील धक्कादायक प्रकार



कल्याण : कल्याणमध्ये प्लास्टिक पिशव्यांवर कारवाई गलेल्या सहाय्यक आयुक्त व त्यांच्या पथकावर एपीएमसी मार्केटमधील व्यापाऱ्यांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. लाईट बंद करत शिवीगाळ करत पथकाला कांदे फेकून मारल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी रितसर तक्रार केली जाणार असल्याचे अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले. या घटनेचा म्युनिसिपल कामगार संघटनेकडून निषेध नोंदविण्यात आला आहे. व्यापाऱ्यांनी कारवाई करणाऱ्या पथकावर कांदे फेकत शिवीगाळ केली

कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात महापालिकेकडून प्लास्टिक बंदी बाबत ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर आज केडीएमसीचे सहाय्यक आयुक्त सुधीर मोकल आपल्या पथकासह पहाटे वाजण्याच्या सुमारास एपीएमसी मार्केटमध्ये कारवाई करण्यास गेले. कारवाईदरम्यान मार्केटमधील व्यापाऱ्यांनी सहाय्यक आयुक्त मोकल व त्यांच्या पथकाने कारवाई करण्यास सुरुवात केली. काही क्षणातच व्यापाऱ्यांनी लाईट बंद करून या पथकाला शिवीगाळ करत त्यांना कांदे फेकून मारले. व्यापाऱ्यांची वाढती गर्दी पाहता पथकाने तेथून काढता पाय घेतला. याबाबत पोलीस ...पान २ वर...



पोलीस बातमी पत्र

मुंबई

मुंबई, मंगळवार ११ ते १७ जानेवारी २०२२



# घरात घुसून हिसकावले मंगळसूत्र



घरात घुसून लुटारूने महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पोबारा केला.

ही खळबळजनक घटना शनिवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास खसाळ्यातील जिभकाटे ले-आऊट येथे घडली. या घटनेने परिसरातील रहिवाशांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. मनोरमा मनोरंजन शेट्टी (वय ४१) यांनी दिलेल्या तक्रारीवरून कपिलनगर पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनोरंजन हे चालक आहेत. त्यांना तीन अपत्ये आहेत. शनिवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास मनोरंजन हे कामानिमित्त बाहेर गेले. सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास त्यांची मुले अभ्यास करीत होती. मनोरमा या स्वयंपाक करीत होत्या. याचदरम्यान दरवाजाचा आवाज आला. मनोरमा या स्वयंपाक घरातून हॉलमध्ये आल्या. एक युवक त्यांच्याजवळ आला. काही कळायच्या आतच त्याने मनोरमा यांच्या गळ्यातील ४० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र हिसकावले व बाहेर पळाला. बाहेर उभ्या असलेल्या मोटरसायकलवरील साथीदारासह तो पसार झाला. मनोरमा यांनी आरडा-ओरड करताच शेजारी गोळा झाले. एका शेजाऱ्याने माहिती देताच कपिलनगर पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला असून सीसीटीव्हीच्या आधारे लुटारूचा शोध घेण्यात येत आहे.

# गुलाबी थंडीत मॉर्निंग वॉकचं निमित्त वाळू उपसा करणाऱ्या तस्करांना अधिकाऱ्याने शिकवला धडा

विकास दळवी, हिंगोली : हिंगोली शहरालगत गारमाळ शिवारात ५९ ब्रास वाळू साठ्यासह एक हायवा व लिंबाळा मक्ता शिवारातून एक ट्रॅक्टर अशी दोन वाहने उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांच्या पथकाने आज पहाटे जप्त केली आहे. मॉर्निंग वॉकच्या निमित्ताने कडाक्याच्या थंडीत झालेल्या या कारवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.



हिंगोली उपविभागांतर्गत हिंगोली व सेनगाव तालुक्यातील वाळू घाटातून मागील काही दिवसांत अवैधपणे वाळू उपसा करून वाहतूक केली जात असल्याचे चित्र होते. विशेषत: रात्रीच्या वेळी वाळू उपसा करून पहाटेच वाहनांद्वारे वाळूची वाहतुक केली जात होती. याबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारीही केल्या जाऊ लागल्या होत्या.

दरम्यान, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांनी पथक स्थापन केले. त्यानंतर कोणत्या भागातून पहाटेच्या सुमारास वाळूची वाहतुक होते याची माहिती घेतली. त्यानंतर आज पहाटे पाच वाजता उपविभागीय अधिकारी पारधी, मंडळ अधिकारी खंदारे, मदीलवार, तलाठी प्रदीप इंगोले, सय्यद अब्दूल, रवी इंगोले, सुरेश चौधरी यांच्यासह पथकाने लिंबाळा भागात पाहणी केली. यामध्ये वाळू वाहतुक करणारे एक ट्रॅक्टर जप्त केले. तसेच गारमाळ शिवारातून एक हायवा व ५० ब्रास वाळू साठा जप्त केला आहे. सदरील वाळू वाहनाद्वारे तहसील कार्यालयात आणण्यात आला आहे.

दरम्यान, उपविभागीय अधिकारी पारधी यांनी मॉर्निंग वॉकच्या निमित्ताने फिरुन केलेल्या या कारवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहे. पुढील काही दिवसांतच जप्त केलेल्या वाळूसाठ्याचा जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने लिलाव केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

कारवाई दरम्यान पथकाला पाहून एक वाळूने भरलेला ट्रॅक्टर पळ काढण्याचा प्रयत्न करत होता.

# धक्कादायक! पोलीस स्टेशनसमोरच काकासोबत जाणाऱ्या मुलीला पळवण्याचा प्रयत्न




नाशिक : शहरात गुन्हेगारीचं प्रमाण वाढत असताना आज आणखी एक धक्कादायक घटना घडली आहे. चक्क पोलीस ठाण्यासमोरूनच मुलीचे अपहरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शहरातील मार्केट यार्ड परिसरात एक मुलगी आपल्या काकांसोबत पायी चालत असताना काही गुंडांनी तिची छेड काढत अपहरण करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मुलीसोबत असलेल्या काकांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न करत त्यांच्याशी दोन हात केले आणि घाबरलेल्या मुलीने आरडाओरड करण्यास सुरुवात केली. त्यानंतर पोलीस ठाण्यातील काही कर्मचारी मदतीला धावून आल्याने अपहरणकर्त्यांचा डाव फसला. या घटनेत पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतलं असून पुढील कारवाई करण्यात येत आहे. पोलीस ठाण्यासमोरच अपहरणाचा प्रयत्न झाला असल्याने आता नाशिक शहरात महिला व मुली किती सुरक्षित आहे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, दिवसेंदिवस शहरातील गुन्ह्यांमध्ये वाढ होताना दिसत आहे. चोरी, अपहरण, विनयभंग, चेन स्नॅचिंग अशा घटना वाढत असल्याने महिलांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे. एकीकडे शहर पोलीस वेगवेगळ्या मोहिमा राबवत असताना दुसरीकडे मात्र गुन्हेगारीचा आलेख मात्र वाढत चालला आहे. या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी आता नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# नव्वद लाखांचा गुटखा धडक कारवाईत जप्त

राज्यात गुटख्याला बंदी असताना परराज्यातून आणलेला ९० लाख रुपयांचा गुटखा हडपसर पोलिसांनी जप्त करून धडक कारवाई केली आहे. रविवारी पहाटे पाच वाजता १५ नंबर हडपसर येथे आयशर टेम्पोला थांबवून पोलिसांनी ताब्यात घेऊन पाहणी केली असता त्यात गुटख्याने भरलेल्या गोण्या आढळल्या. ही कारवाई अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. चालकावर अन्न व औषध कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला असून, गुटखा मालकाचा पोलिस शोध घेत आहेत.



अन्न व औषध प्रशासन विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी अनिल गवते (वय ५२) यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी टेम्पो चालक सामी उल्लाह मूर्तजा हुसैन (वय ५१, रा. मुंबई, मूळ गाव उत्तर प्रदेश) असे अटक केलेल्या चालकाचे नाव आहे.

टेम्पोमध्ये हिरा कंपनीचा सुमारे ४६ लाख रुपयांचा गुटखा असून, टेम्पोची किंमत २५ लाख रुपये आहे. असा ७१ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. गुटखा दुप्पट किमतने विकत असल्याने बाजार मूल्यानुसार ९० लाख रुपयांचा असल्याचे अन्न सुरक्षा अधिकारी गवते यांनी सांगितले.

गुटख्याच्या मालकाचा हडपसर पोलिस शोध घेत आहेत.

नव्वद लाख रुपयांच्या गुटख्याची वाहतूक करणारा टेम्पो ताब्यात घेऊन हडपसर पोलिसांनी चालकाला अटक केली.

# पोलीस कर्मचाऱ्याच्या घरासमोर होमगार्ड तरुणीने स्वत:चा पेटविले



वर्धाः वर्धेच्या पिंपरी मेघे येथील पोलीस वसाहतीत रविवारी रात्रीच्या सुमारास एका होमगार्ड तरुणीने अंगावर पेट्रोल घेत स्वतःला पेटवून घेतल्याची घटना घडली आहे. या घटनेत तरुणी गंभीररित्या भाजल्याने तिला नागपूर येथे रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे. तरुणीने एका पोलीस कर्मचाऱ्याच्या घरासमोर स्वतःला पेटवल्याने परिसरात खळबळ निर्माण झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार वर्धेच्या आदिवासी कॉलनी परिसरात रहाणाऱ्या ३६ वर्षीय अंजली मैंद असं जखमी तरुणीच नाव आहे. पिंपरी मेघे येथील पोलीस वसाहतीतील शरद या बिल्डिंगच्या दुसऱ्या माळ्यावरील एफ-२ क्रमांकाच्या घरासमोर या तरुणीने स्वतःला पेटवून घेतले. तरुणीने स्वतःला पेटविल्याची बाब आजूबाजूच्या नागरिकांच्या लक्षात येताच तिला वाचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेत तरुणी ही ७० ते ८० टक्के भाजली असल्याची माहिती असून तिला नागपूर येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येत पाहणी केलीय. या तरुणीने आत्महत्येचा प्रयत्न का केला हे अद्याप कळू शकले नसून चर्चांना उधाण आले आहे.

# प्रेम प्रकरणातून चाकू हल्ला

औरंगाबाद : धुळ्यावरून औरंगाबादेत आलेल्या काही जणांनी तरुणावर चाकूने वार केले. ही घटना शनिवारी (आठ जानेवारी) रात्री सव्वाआठ वाजण्याच्या दरम्यान कामगार उपायुक्त कार्यालयाजवळ घडली. शुभम दिलीप बागूल (वय २५, बालाजीनगर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी क्रांती चौक पोलिस ठाण्यात हरिष चौधरी (वय २५) आणि हितेश चौधरी (वय ३० रा. दोघेही धुळे) यांच्यासह इतर सहा अशा एकूण आठ जणांविरोधात गुन्हा दाखल झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. हा चाकूहल्ला प्रेमसंबंधातून झाल्याची माहिती समोर येत आहे.

या प्रकरणी क्रांतीचौक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुभम दिलीप बागूल याला शनिवारी रात्री हरीश चौधरीने फोन करून महावीर चौकाजवळ बोलावून घेतले. दरम्यान, 'माझ्या बहिणीवर प्रेम करतो?' असे म्हणत वाद घातला. संशयित आरोपीने शुभमला मोबाइल मागितला. परंतु, शुभमने मोबाइल न दिल्याने हा वाद अधिकच वाढला. त्याचवेळी आरोपीने शुभमवर चाकूने सपासप पाच वार केले आणि शुभमचा मोबाइल घेऊन धुळ्याला फरारी झाल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर जखमी अवस्थेत शुभमने दुसऱ्याच्या मोबाइलवरून त्याच्या भावाला फोन केला. यानंतर कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेऊन शुभमला 'घाटी'त दाखल केले. सध्या त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे नातेवाइक आणि पोलिसांनी सांगितले.



प्रेमप्रकरणातून हल्ला

जखमी शुभम हा धुळ्यातील मनमाडजीण कॉलनीत नातेवाइकाकडे राहत होता. तो ॲल्युमिनीयम स्लायडिंग खिडक्यांचे काम करीत असे. दरम्यान, गल्लीतीलच एका मुलीच्या तो प्रेमात पडला. मुलीचा विवाह झाल्यानंतरही त्यांच्यात प्रेमसंबंध असल्याचा संशय मुलीच्या नातेवाइकांना होता. जवळपास दोन वर्षांच्या कालावधीनंतर शुभम हा औरंगाबादेत आला होता.

## पृष्ठ १ वरुन

### कर्मचारी कामावर आल्यावर

समितीसोबत आज चर्चा करण्यात आली आहे. कृती समितीने पूर्वी दिलेल्या मागण्या मान्य झाल्या होत्या. मागण्या मान्य झाल्यानंतरही विलनीकरणाच्या मुद्द्यावरुन हा संप सुरु आहे. विलनीकरणा संदर्भात तयार करण्यात आलेली समिती १२ आठवड्यात आपला अहवाल सादर करणार आहे. या अहवालाचे पालन कर्मचारी आणि राज्य शासनावर बंधन असणार आहे. कर्मचाऱ्यांना मूळ वेतनात पगारवाढ देण्यात आली आहे. पगारवाढीमध्ये काही तफावत झाली आहे. त्याबाबत कृती समितीसोबत चर्चा करण्यात आली आहे. कृती समितीने सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पगारवाढ देण्यात यावी अशी मागणी करुन आकडेवारी दिली आहे. या आकडेवारीचा अभ्यास करुन निर्णय एसटी सुरु झाल्यानंतर देण्यात येईल," असे परिवहन मंत्री अनिल परब यांनी सांगितले. "एसटी कर्मचाऱ्यांना कारवाईबाबत आम्ही तीन वेळा मुदत दिली होती. दिलेल्या मुदतीमध्ये कामावर परतणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार नसल्याचे आम्ही सांगितले होते. आतापर्यंत ज्या कर्मचाऱ्यांवर कारवाई झालेली नाही असे कर्मचारी कामावर आल्यावर त्यांच्यावर कारवाई होणार नाही. अफवा पसरवून आणि भीती निर्माण करुन कर्मचाऱ्यांना कामावर जाण्यापासून रोखले जात आहे. एसटी सुरु झाल्यांनतर कारवाई झालेल्या कर्मचाऱ्यांबाबत काय निर्णय घ्यायचा यावर चर्चा करण्यात येणार आहे," असे अनिल परब म्हणाले. कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आमचे दायित्व आहे तसेच महाराष्ट्रातील जनतेच्या बाबतीतही आहे. कर्मचारी संघटनांनी संप मागे घेण्यासाठी मैदानात उतरले पाहिजे असे शरद पवार यांनी सांगितले आहे. त्यामुळे कृती समितीच्या सर्व सदस्यांनी कर्मचाऱ्यांना हा निरोप दिला आहे. जे प्रश्न आहेत ते चर्चेने सोडवले जातील पण जनतेला वेठीस धरुन कुणाचाही फायदा होणार नाही. त्यामुळे एसटीचे आणि कर्मचाऱ्यांचे अजून नुकसान होऊ नये अशी आमची इच्छा आहे," असे अनिल परब यांनी म्हटले आहे. विलनीकरणाचा मुद्दा उच्च न्यायालयाने त्रिसदस्य समितीसमोर ठेवला आहे. आम्ही सुद्धा त्या अहवालाची वाट पाहत आहोत. एखादा मुद्दा न्यायालयात असताना त्यावर भाष्य न करणे आमच्यासाठी बंधनकारक आहे, असे अनिल परब म्हणाले.

### भारतातील सर्वात मोठ्या मावळ्या

मुंबईकरांच्या जीवनाला आणि मुंबईच्या वाहतूकीला गती देणारा हा प्रकल्प आहे. कोरोना काळात, उन वारा पावसाच्या काळातही प्रकल्पाचे काम अडले नाही, ते तितक्याच वेगाने सुरु राहिले. दोन टोक विशेषत: समुद्राखालून जोडायचे हे काम आव्हानात्मक होते," असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी हे काम आपण शक्य करून दाखवल्याचं सांगत तमाम मुंबईकरांच्यावतीने धन्यवाद मानले. "ठरलेल्या तारखेला सागरी किनारा मार्ग प्रकल्प पूर्ण होईल" उद्धव ठाकरे म्हणाले, "१९९५ साली मुंबईत युती शासनाने ५५ उड्डाणपूल बांधले. आता ते देखील कमी पडू लागले आहेत. नंतर आपण कोस्टल रोडचे स्वप्न पाहिले. आपण केवळ रस्त्याचे काम करत नाही, तर आसपासच्या भागाचे सुशोभीकरणही करत आहोत. ठरलेल्या तारखेला सागरी किनारा मार्ग प्रकल्प पूर्ण होईल असा मी विश्वास देतो. शासन आवश्यक असलेले सर्व सहकार्य करेल याचे वचन देतो." "मुंबईकरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अहोरात्र झटत आहात""मुंबईकरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अहोरात्र झटत आहात तुम्हाला मी शुभेच्छा देतो. कोस्टल रोड तुमच्या मेहनत, चिकाटी आणि जिद्दीतून निश्चित कालावधी आधी पूर्ण होईल," असा विश्वास उद्धव ठाकरेंनी व्यक्त केला."कठीण काम मावळ्याने पार पाडले, पहिले टनेल पूर्ण" मंत्री आदित्य ठाकरे म्हणाले, "आज अतिशय आनंदाचा, अभिमानाचा दिवस आहे. कठीण काम मावळ्याने पार पाडले. पहिले टनेल पूर्ण झाले. इज ऑफ लिविंगवर फोकस करून मुंबई उपनगरात विविध कामे सुरू आहेत. मुंबईला पुढे नेण्याची ताकत या कामांमध्ये आहे. बीएमसी टीमचे अभिनंदन आणि सर्वांना शुभेच्छा. ऑन ग्राऊंड काम करणाऱ्या टीमलाही शुभेच्छा." "एक वर्षात बोगदा पूर्ण झाला" आयुक्त इक्बालसिंह चहल यांनीही यावेळी आपलं मनोगत व्यक्त केलं. ते म्हणाले, "सुखाचा प्रवास मोकळा श्वास हे या प्रकल्पाचे ब्रीद आहे. एक वर्षात बोगदा पूर्ण झाला. ११ जानेवारी २०२१ रोजी कामास प्रारंभ झाला होता. हा एकप्रकारे विक्रम आहे. नियोजित तारखेपर्यंत हा बोगदा पूर्ण होईल असा विश्वास वाटतो." कार्यक्रमास मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, महापौर किशोरी पेडणेकर, आयुक्त इक्बालसिंह चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांच्यासह पालिकेचे नगरसेवक, पालिकेचे अधिकारी ही दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

### महापौर ॲक्शन मोडमध्ये

पेडणेकर ॲक्शन मोडमध्ये दिसून येत आहेत. महापौर किशोरी पेडणेकर यांनी गेट वे ऑफ इंडिया परिसरातील पाहणी करण्यासाठी अचानक भेट दिली. मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी गेट वे ऑफ इंडिया परिसरात पाहणी केली. पाहणी करत असताना ज्यांनी मास्क घातला नाही त्यांना मास्क घालण्यासंदर्भात महापौरांनी सूचना देखील दिल्या. नियम मोडणाऱ्यांना महापौर किशोरी पेडणेकर यांनी कडक शब्दांत समज दिली. तसेच नियमांचे पालन करण्याचे आवाहनही यावेळी महापौर किशोरी पेडणेकर यांनी केले.यावेळी महापौर किशोरी पेडणेकर म्हणाल्या, कोस्टल रोड संदर्भात येत्या दोन दिवसात स्पष्टपणे चित्र दिसेल. आता एवढ्यात मी बोलणार नाही. विरोधक आणखी 25 वर्षे विरोधी पक्षात बसतील. त्यांना फक्त विरोध करणे हे एकच काम आहे. मी गेट वे परिसरात येऊन पाहणी केली. कारण आता संचारबंदी लागू होणार आहे. जनतेने मास्क घालन गरजेच आहे अशा सूचना देखील दिल्या. सर्वांनी नियमांच पालन करावं. मुख्यमंत्री सर्वांच हित लक्षात घेऊन निर्णय घेत आहे असंही महापौर किशोरी पेडणेकर म्हणाल्या. मजदूर यांच्या मनात जाणीवपूर्वक भ्रम तयार केला जातोय. लॉककडाऊन लावण्याच्या संदर्भात हा भ्रण निर्माण केला जात आहे. मात्र अशा अफवांवर बिलकुल विश्वास ठेऊ नका. कडक निर्बंध लावण्यात आले आहेत. मात्र लॉकडाऊन नाही असंही महापौर किशोरी पेडणेकर म्हणाल्या. राज्यात कठोर निर्बंध कोरोनाचा हा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी आता राज्य सरकारने कठोर निर्बंध लागू केले आहेत. रात्री 11 ते सकाळी 5 वाजेपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. हॉटेल, मॉल आणि थिएटर रात्री 10 वाजेपर्यंतच सुरू राहणार आहे. हे निर्बंध आणि नियम 10 जानेवारी 2022 च्या मध्यरात्रीपासून लागू होणार आहेत. पंतप्रधानांनी बोलावली तातडीची बैठक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील कोरोनाच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी एक बैठक बोलावली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी 4.30 वाजता ही बैठक होणार आहे. या बैठकीत केंद्रीय मंत्र्यांसह काही वरिष्ठ अधिकारी सुद्धा उपस्थित राहणार आहेत.

### केंद्रीय आरोग्यमंत्र्यासोबत

ॲक्टिव्ह केसेस आजच्या १ लाख ७३ हजार एवढ्या आहेत. प्रामुख्याने बऱ्याच जणांना असं वाटत असतं की, यापैकी आयसीयू मध्ये किती जण आहेत, तर आयसीयू मध्ये एकूण १७११ एवढे रूग्ण आयसीयूमध्ये आहेत. त्यामध्ये ऑक्सिजन किती लोकाना लागलं? तर ते ५ हजार ४०० लोकाना लागलेलं आहे. तर हे एकूण पॉझिटिव्ह केसेसच्या किती टक्के आहे? तर आयसीयूचे एकूण रूग्ण १ टक्का आहे आणि ऑक्सिजन लागणारे एकूण रूग्ण २ टक्के आहे.

### पैसे देण्यासाठी फेक पेटीएम

जगदाळे असे या आरोपींची नावे आहेत. हे सर्व आरोपी मूळचे उत्तर प्रदेशमधील राहणारे आहेत. पोलिसांकडून तपास सुरु दरम्यान, या आरोपींनी Spoof Payatm app या फेक ॲपच्या मदतीने मुंबईत अजून कुठे- कुठे फसवणूक केली आहे, याची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. तसेच या टोळीमध्ये आणखी कोणी साथीदार आहेत का ? हेदेखील पाहिले जात आहे.

### प्लास्टिक पिशवी कारवाईसाठी गेलेल्या

स्टेशनमध्ये तक्रार करणार असल्याचे सहायक आयुक्त सुधीर मोकल यांनी सांगितले. म्युनिसिपल कामगार संघटनेकडून घटनेचा निषेध या घटनेनंतर म्युनिसिपल कामगार संघटनेने निषेध नोंदवला आहे. एपीएमसीमध्ये कारवाई हे आमचे काम नाही यासाठी एपीएमसीने स्वतंत्र पथक नेमले पाहिजे. आज हा हल्ला झालाय, या घटनेचा म्युनिसिपल कामगार संघटनेच्या वतीने तीव्र शब्दात निषेध नोंदवण्यात आला

संपादकीय...



# तेल तिघाड्याचा धोका

करोना विषाणूचा संसर्गप्रसार आणि खनिज तेलाचे दर यांचा संबंध म्हणजे जणू अभद्र युती. सध्या संपूर्ण जग हे करोनाच्या तिसऱ्या/ चवथ्या वा पाचव्या लाटेचा सामना करण्यात गर्क असताना त्याच वेळी आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे दर पुन्हा वाढू लागणे हे एका आजारातील अशक्तपणा दूर व्हायच्या आत अतिसाराने बेजार होण्याची वेळ येण्यासारखे म्हणायचे. सध्या ते तसे आहे खरे! युरोपीय देश तसेच अमेरिका, भारत आदी देश या करोनाकाळाने बेजार झालेले असताना खनिज तेलाच्या दराने धोक्याची प्रति बॅरल ८० डॉलरची मर्यादा ओलांडली. काही आंतरराष्ट्रीय विश्लेषकांच्या मते खनिज तेलाचे दर १०० डॉलर प्रति बॅरलच्या आसपास राहतील वा कदाचित हा टप्पाही ते ओलांडतील. तसे झाल्यास ते अर्थव्यवस्थेसमोरचे सर्वात खडतर आव्हान असेल. तेही निवडणूक वर्षांत. यास 'सर्वात खडतर' असे म्हणायचे याचे कारण करोनाकाळामुळे केंद्र सरकारला वित्तीय तूट मर्यादेत राखणे अवघड जात असताना, सरकारी कंपन्यांचे खासगीकरण गती घेऊ शकत नसल्याने आवश्यक तो निधी जमा होत नसताना खनिज तेलाचे दर वाढणे हे एकाच वेळी तीन आजारांनी ग्रासण्यासारखे आहे. अशा वेळी पर्यायी ऊर्जास्रोतांची चर्चा मोठ्या उत्साहाने होते. पण अनेक तज्ज्ञांनी साधार दाखवून दिल्यानुसार पर्यावरणीय आव्हान, प्रदूषण वगैरे मुद्दे कितीही उच्चरवात उपस्थित केले तरी भारताचे खनिज तेलावरचे अवलंबित्व आणखी काही वर्षे असेच वाढते राहणार असून तसे होत असताना तेलाची दरवाढही होणार असेल तर या वास्तवाचा विचार व्हायला हवा. याचे कारण भारताने कितीही उच्चरवात तक्रार केली तरी तेल निर्यातदार देशांची संघटना (ओपेक) तेल उत्पादन वाढवण्याच्या आपल्या विनंतीस उत्साही प्रतिसाद देण्याची शक्यता नाही. याआधी आपण अशी तक्रार केली असता सौदी अरेबियाचे भावी राजे महंमद बिन सलमान यांनी अत्यंत उद्धटपणे, 'तुमचा राखीव साठा बाहेर काढा' असे आपणास सुनावले होते. तेलाचे भाव रसातळाला गेले असताना जगातील अनेक देशांप्रमाणे भारतानेही मोठ्या प्रमाणावर तेलाची खरेदी करून ते साठवण्याचा प्रयत्न केला. हेतू हा की अडीअडचणीची वेळ आल्यास काही किमान तेलसाठा हाती असावा! तथापि सौदी अरेबियाच्या या आडमुठ्या भूमिकेमुळे आपणावर हा अडीअडचणीचा साठा वापरण्यास काढावा लागण्याची वेळ फारच लवकर आली.

या पार्श्वभूमीवर मंगळवारी 'ओपेक प्लस' संघटनेच्या सदस्य देशांची बैठक होऊन तीत पुढील महिन्यापासून तेल उत्पादन वाढवण्यास मान्यता देण्यात आली. म्हणजे सध्याच्या 'करोना-ओमायक्रॉन'चा धोका कमी झाल्यास आणि त्यातून अर्थव्यवस्थेचे फारसे नुकसान न झाल्यास तेल अधिक प्रमाणात वाहू लागेल. गेल्या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यापासून दर महिन्यास चार लाख बॅरल्स अधिक अशा गतीने तेल उत्पादन करण्याचा निर्णय 'ओपेक प्लस' या देशांच्या संघटनेने घेतला होता. तथापि त्याची त्या प्रमाणात पूर्तता होऊ शकलेली नाही. आताच्या ओपेकच्या निर्धारानुसार समजा तेल उत्पादन वाढले तरी करोनापूर्व काळातील तेल उत्पादनाशी त्याची बरोबरी होण्यास यंदाचा सप्टेंबर महिना उजाडेल. गतवर्षी करोनाने जग ठप्प केले तेव्हा या संघटनेने तेलाच्या उत्पादनात दररोज एक कोटी बॅरल्स इतकी प्रचंड कपात केली. हा खड्डा अद्यापही पूर्णपणे भरून आलेला नाही. म्हणजे मागणीत वाढ होत असतानाही पुरवठा तितक्या प्रमाणात वाढत नसल्याने तेलाचे भाव चढेच राहिलेले आहेत. या संदर्भात वास्तविक अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनीही सदर संघटनेस तेल उत्पादन वाढवण्याची सूचना केली. पण तिलाही केराची टोपलीच दाखवली गेली. या वास्तवामुळे भारतासमोरील आव्हान अधिक गडद होते. याचे कारण असे की कितीही आटापिटा केला तरी पेट्रोल आणि डिझेलची आपली तहान भागणे सोडाच, पण कमी व्हायचीही शक्यता दृष्टिपथात नाही. उलट करोनोत्तर काळात अर्थव्यवस्था जसजशी पूर्वपदावर येईल तसतशी तेलाच्या मागणीत वाढच होईल. गेली दोन वर्षे तेलाच्या मागणीत दरसाल सहा ते आठ टक्के इतकी वाढ आपण नोंदवत आहोत. गेल्या वर्षी तर ऑक्टोबर महिन्यात या वाढीचा वेग सर्वाधिक होता. कारण सणासुदीचा काळ आणि करोनाने घेतलेली उसंत. या काळात नागरिकांनी अधिकाधिक खर्च करावा असे खासगी क्षेत्राचे प्रयत्न होते. त्याप्रमाणे खर्च होऊ लागला. पण तो होताना याच काळात तेलाच्या मागणीतही वाढ होत गेली. म्हणजे करोनाचा जोर वाढला तर अर्थव्यवस्था मंदावते आणि या काळात खनिज तेलाची मागणी कमी होऊन दरही काही अंशी कमी होतात. पण करोनाच्या काळ्या सावटातून अर्थव्यवस्थेने जरा गती घेण्याचा प्रयत्न केला की खनिज तेलाची मागणी वाढते आणि त्याबरोबर तेलाचे दरही वाढू लागतात. उदाहरणार्थ २०२० या वर्षांत करोनाचा कहर जोरात असताना खनिज तेलाचे प्रति बॅरल दर साधारण ४० ते ४२ डॉलर्सच्या घरात होते.

# चेहऱ्याच्या असह्य वेदनेची कहाणी



साल होतं १८६७. स्थळ लॉस एंजेलिस, अमेरिका. यूसीएलए विद्यापीठाच्या न्युरोसर्जरी विभागातील ऑपरेशन थिएटर. या प्रख्यात विद्यापीठातील दोन नामवंत न्युरोसर्जन मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारा मायक्रोस्कोप या ठिकाणाहून दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये हलवत होते. मायक्रोस्कोप एका ठिकाणाहून दुसरीकडे हलवणे हे जिकिरीचं काम असतं. ज्या न्युरोसर्जनच्या मालकीचा हा मायक्रोस्कोप होता त्याचं नाव होतं डॉक्टर रॅण्ड आणि त्याच्या बरोबर असलेली व्यक्ती म्हणजे डॉक्टर पीटर जेनाटा.

डॉक्टर जेनाटा हे एक कुशाग्र बुद्धिमत्तेचं आणि स्वभावाने अत्यंत कलंदर व्यक्तिमत्त्व. 'ट्रायजेमिनल न्यूराल्जिया' हा अत्यंत वेदनादायक आजार कायमचा बरा करण्याची शस्त्रक्रिया शोधून काढण्याचा ध्यास त्यांनी घेतला होता. हा आजार विशिष्ट प्रकारच्या शस्त्रक्रियेने निश्चित बरा होईल याची त्यांना खात्री होती. त्यांच्या दुर्दैवाने यूसीएलएच्या हॉस्पिटलमध्ये काहीशा जुन्या विचारांच्या लोकांची सद्दी होती. अर्थातच पीटर जेनाटासारख्या व्यक्तींचं त्यांच्याबरोबर पटणं जवळजवळ अशक्यच. त्यामुळेच अशा प्रकारची शस्त्रक्रिया या हॉस्पिटलमध्ये करण्यास त्यांना मज्जाव करण्यात आला होता. अर्थातच डॉक्टर जेनाटा हेसुद्धा सहजी हार मानणाऱ्यातले नव्हते. मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारा मायक्रोस्कोप हा डॉक्टर रॅण्ड यांच्या व्यक्तिगत मालकीचा होता. त्यामुळे रॅण्ड यांना जवळजवळ 'पटवून'च हा मायक्रोस्कोप दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये नेऊन शस्त्रक्रिया पार पाडण्याचं त्यांनी ठरवलं होतं. केवढा हा उपद्व्याप!!

दोघा 'उद्योगी' माणसांनी हा मायक्रोस्कोप विलग केला, त्याचे सुटे भाग हातात घेऊन ते डॉक्टर जेनाटांकडे असलेल्या फोक्सवॅगन कंपनीच्या स्टेशन वॅगन गाडीत काळजीपूर्वक भरले आणि दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये नेऊन ते पुन्हा जोडून तिथे वापरण्यासाठी मायक्रोस्कोप तयार झाला!

अशा अनेक, कुशाग्र बुद्धीच्या आणि कलंदर वृत्तीच्या 'उपद्व्यापी' लोकांच्या 'उद्योगां'मुळेच वैद्यकशास्त्रातले अनेक शोध आजतागायत लागलेले आहेत.

ट्रायजेमिनल न्युराल्जिया म्हणजेच चेहऱ्याच्या निम्म्या भागात येणारी तीव्र कळ. त्या बाजूच्या कपाळ, डोळा, गाल व हनुवटी या भागात येणारी. अत्यंत तीव्र आणि जीवघेणी. या आजारात व्यक्तीने बोलण्यासाठी तोंड उघडलं, दात घासताना ब्रशचा हिरडीला स्पर्श झाला, पंख्याचा किंवा खिडकीतून येणारी गार हवा चेहऱ्याच्या त्या भागाला लागली, तोंड पुसताना टॉवेलचा गालाला स्पर्श झाला, नाक साफ करताना बोटाचा त्या बाजूच्या नाकपुडीला किंवा वरच्या ओठाला ओझरता जरी स्पर्श झाला तरी अचानक विजेच्या करंटसारखी तीव्र कळ त्या भागातून सुरू होऊन चेहऱ्याच्या निम्म्या भागात पसरते. अचानक विजेचा उच्च दाबाचा करंट लागल्याप्रमाणे, हिरडी किंवा चेहऱ्यावर मिरचीची तांबडी पूड टाकल्याप्रमाणे, चेहऱ्याच्या त्या भागात एखादा अणकुचीदार चाकू खुपसल्याप्रमाणे, अनेक इंगळ्या एकाच वेळी चेहऱ्याच्या अर्ध्या भागाला डसल्याप्रमाणे अशा विविध प्रकारे रुग्णांनी या तीव्र कळेचं वर्णन केलेलं आहे.

या आजाराची सुरुवात होताना ही कळ फक्त काही सेकंदच टिकते. त्यानंतर मात्र या वेदनेची तीव्रता आणि वेळ वाढत जाते. या आजारात, अगदी सुरुवातीच्या काळात कधीकधी ही कळ आपोआप कमीसुद्धा होते पण नंतर मात्र वेगाने तिची तीव्रता वाढत जाते. हे दुखणं इतकं भीषण आणि जीवघेणं असतं की याचं वर्णन रुग्णांनी वेगवेगळ्या शब्दांत केलेलं आहे.

'सर्व प्रकारच्या वेदनादायी आजारांपैकी सर्वात वाईट आणि तीव्र वेदना..'

'अशा वेदनेबरोबर जगण्यापेक्षा आत्महत्या परवडलीअशी भावना निर्माण करणारी वेदना'

'वेदनेच्या रूपात मिळालेला शाप'

'आपल्या शत्रूलासुद्धा होऊ नये अशी वेदना.'' अशा अनेक प्रकारे.

हा आजार जगभर 'आत्महत्या-प्रेरक' आजार म्हणून ओळखला जातो कारण या वेदनेने काही रुग्ण इतके अगतिक होतात की 'जगण्यापेक्षा मरण पत्करलं' या भावनेतून जीवनाचा अंत करतात. आणि म्हणूनच १९६७ साली, या आजारावर निश्चित आणि कायमस्वरूपी अशा प्रकारची शस्त्रक्रिया शोधून काढणे अत्यंत आवश्यक आहे, याची डॉ. जेनाटाना खात्री पटलेली होती.

त्याआधीच्या काळात मेंदूवर शस्त्रक्रिया करून चेहऱ्याच्या दुखऱ्या भागातील संवेदना मेंदूपर्यंत वाहून नेणारी नस कापून टाकली जायची. मात्र त्यामुळे दर वेळी वेदना थांबायचीच असं नाही. तसंच, चेहऱ्याचा तो अर्धा भाग कायमचा बधिर व्हायचा. त्यात भर म्हणजे त्या बाजूचा डोळा जाण्याची शक्यतासुद्धा निर्माण होत असे. इतर काहीच कायमचे इलाज नसल्यामुळे ही शस्त्रक्रिया करावी लागायची.

शास्त्रीय शोध लागण्याच्या प्रक्रियेत अत्यंत चाणाक्ष आणि तीक्ष्ण निरीक्षणशक्ती असलेल्या व्यक्तींनी नोंदवून ठेवलेल्या गोष्टी कशा अमूल्य ठरतात याचं उदाहरण इथे दिसतं.

१९३० च्या दशकात डॉ. डॅन्डी या जगप्रसिद्ध न्युरोसर्जनला नस कापण्याची ही 'नाइलाजास्तव' करण्यात येणारी शस्त्रक्रिया करताना एक महत्त्वाची गोष्ट वारंवार जाणवली होती. डॉक्टर डॅन्डी यांनी लिहून ठेवलं आहे..'मी जेव्हा जेव्हा ही नस कापण्यासाठी मेंदू उघडतो तेव्हा अनेक वेळेला या नसेला अगदी चिकटूनच रक्तवाहिनी असते. ही रक्तवाहिनी नसेमध्ये रुतलेली असते आणि तिची स्पंदनं नसेवर आपटत असतात. या स्पंदनांच्या दाबामुळे तर ही असह्य कळ येत नसेल?'

डॉक्टर जेनाटा यांच्या स्वत:च्या निरीक्षणांशीसुद्धा हे लिखाण मिळतंजुळतं होतं. शिवाय न्युरोसर्जरीचा प्राथमिक मायक्रोस्कोप १९६० च्या दशकात उपलब्ध झाला होता. याच्या आधारावरून, नसेपासून रक्तवाहिनी दूर करून ही कळ, 'नस न कापता', कायमची बरी होऊ शकेल असा डॉक्टर जेनाटा यांचा कयास होता. या त्यांच्या म्हणण्याला तेव्हाच्या वैद्यकीय मरतडांनी अगदी कसून विरोध केला. 'स्वत:च्याच शरीरातील रक्तवाहिनी असा आजार कसा निर्माण करेल? हा माणूस काहीतरी अशास्त्रीय बरळतो आहे!'

अशा प्रकारची भरपूर टीका त्यांच्यावर झाली. या विरोधामुळे डॉ. जेनाटांना जरी त्रास झाला तरी त्यांची जिद्द मात्र उलट वाढत गेली. त्यांनी या मरणप्राय वेदनेने तडफडणाऱ्या अनेकांना या दुखण्यातून त्यांच्या शस्त्रक्रियेने बरं केलं. हळूहळू सर्व वैद्यकीय जगताला याची दखल घ्यावीच लागली. ही शस्त्रक्रिया मायक्रो व्हास्क्युलर डीकॉम्प्रेशन (एमव्हीडी) या नावाने प्रचलित झाली. आज या शस्त्रक्रियेत अत्याधुनिक न्युरो मायक्रोस्कोपच्या साहाय्याने दुखऱ्या नसेवर आदळणारी रक्तवाहिनी दूर करून त्यांच्यामध्ये 'टेफ्लोन' या पदार्थाचा न विरघळणारा कापूस ठेवला जातो.

अगदी आजही, आपल्या देशात ट्रायजेमिनल न्युराल्जिया या आजाराने ग्रस्त असलेल्या दुर्दैवी रुग्णांपर्यंत हा आजार शस्त्रक्रियेने बरा होऊ शकतो ही माहिती म्हणावी तशी पोहोचत नाही.

डॉक्टर जेनाटा आणि डॉक्टर डॅन्डी यांचं कार्य पुढे चालू राहावं म्हणून या आजारावर संशोधन करण्यासाठी, आणि हे रुग्ण वेदनामुक्त व्हावेत या उद्देशाने पुणे येथे गेली १५ वर्षे या आजाराचं केंद्र कार्यरत आहे.

प्रत्येक रुग्णावर शस्त्रक्रिया करताना डॉक्टर जेनाटा आणि डॉ. डॅन्डी यांनी लावलेला शोध किती अमूल्य आहे आणि शस्त्रक्रिया किती अचूक आहे याची प्रचीती येऊन आजही मी नतमस्तक होतो.

# अवैध सावकारी करणा-यांवर गुन्हे




शहरातील अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी सुरू केलेल्या हेल्पलाइनला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या हेल्पलाइन आलेल्या १२ तक्रारींवरून सात सावकारांवर गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. शहरात खासगी सावकारांचा सुळसुळाट झाला होता. अडचणीत सापडलेल्यांना अवैध सावकार दरमहा पाच ते ५० टक्के दराने कर्ज देतात आणि नंतर पठाणी पद्धतीने व्याजवसुली करून कर्जदारांची आर्थिक पिळवणूक करतात. व्याजाचे पैसे देण्यास उशीर झाल्यास कुटुंबीयांनादेखील त्रास दिला जात होता. यामधून शहरात काही गुन्हेदेखील घडले. घेतलेले कर्ज आणि व्याज परत करताना कर्जदाराला तारेवरची कसरत करावी लागत होती. नोकरी आणि उद्योगधंद्यातून मिळालेली रक्कम सावकारांच्या खिशात जात होती. याबाबतच्या तक्रारी पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांच्या कानावर आल्यानंतर त्यांनी अवैध सावकारी करणाऱ्यांवर कारवाईचे आदेश दिले होते. पुणे पोलिसांकडून अवैध सावकारी करणाऱ्यांची माहिती देण्यासाठी नागरिकांना हेल्पलाइन क्रमांक ९१४५००३१०० उपलब्ध करून दिला.

या क्रमांकावर सुरू असलेल्या व्हॉट्स ॲपवरदेखील नागरिक तक्रारी करू शकतात; तसेच या क्रमांकाची सोशल मीडियावर प्रसिद्धी केली होती.

पुणे पोलिसांकडून अवैध सावकारांवर कारवाई सुरू केल्यानंतर एका महिन्याभरात या हेल्पलाइनवर १२ पेक्षा अधिक अवैध सावकारांच्या तक्रारी आल्या आहेत. त्या तक्रारींची पोलिस उपायुक्तांकडून पडताळणी केली जाते. त्यानंतर अवैध सावकारांवर कारवाई केली जाते. गेल्या महिन्यात आलेल्या तक्रारीपैकी सात अवैध सावकारांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली आहे.

# लैंगिक छळाची बळी तरुणीलाच पोलिसांनी बनवले चक्क दरोड्याचे आरोपी

## न्यायासाठी पुढाकर घेतलेल्या पत्रकार-कार्यकर्त्यांवरही गुन्हा दाखल ठाण्यातील श्रीनगर पोलिसांचे अजब कृत्य

ठाणे - देशभरात आणि जगभरात महिलांच्या सुरक्षेसाठी कडक कायदे केले जात असताना आणि महिला सक्षमीकरणासाठी व त्यांच्यावरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी प्रभावी पावले उचलली जात असतानाच देशाची आर्थिक राजधानी मुंबईला लागून असलेल्या ठाण्यातील वागळे इस्टेटमध्ये एक विचित्र घटना घडली आहे. परिसरातील श्रीनगर पोलिसांनी एका तरुणीला दरोड्याचा आरोपी बनवल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी आपल्या खाकी वर्दीची मर्यादा इतकी ओलांडली की, लैंगिक छळाची बळी असलेल्या या तरुणीला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या पत्रकारासह ज्या काही राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांनीही या गुन्ह्याला वाचा फोडली, पोलिसांनी त्यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल केला आहे.

' जेजेव्ही न्यूज ' नावाच्या डिजिटल मीडियाचे संपादक चंद्रभूषण विश्वकर्मा हे पोलिसांच्या निर्दयतेला बळी पडले आहेत. या संपूर्ण प्रकाराबाबत त्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री, गृहमंत्री, राज्याचे पोलीस महासंचालक आणि ठाणे पोलीस आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार केली असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषी पोलिसांसह छळवणूक करणाऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करण्याची विनंती केली आहे.

घटनेतील पीडित तरुणी तिच्या वडिलांसोबत भंगारचा व्यवसाय करते. ती नेहमी तिच्या व्यवसायाच्या अनुषंगाने वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये जात असते. काही दिवसांपूर्वी तिने वागळे इस्टेटच्या हनुमान नगर येथील एएमजे कॉर्पोरेशनचे मालक राजिंदरपाल सिंग यांची याच व्यवसायासंदर्भात भेट घेतली होती. मात्र किंमत व जीएसटीच्या मुद्द्यांमुळे तो सौदा ठरला नाही. तरीदेखील या तरुणीने आपल्या व्यवसायाबाबत सिंग यांचा सातत्याने पाठपुरावा केला. मुलीच्या आरोपानुसार, याचदरम्यान १९ डिसेंबर २१ रोजी तिचे व्यावसायिक सिंग यांच्याशी व्हॉट्सअप कॉलवर बोलणे झाले, यासंभाषणामध्ये सिंगने तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवण्याची मागणी केली. याबाबत तरुणीने तिचे नातेवाईक उमेश भग्गी यादव यांना माहिती दिली. दुसऱ्या दिवशी उमेशच्या सांगण्यावरून शिवसेना व मनसेच्या काही कार्यकर्त्यांनी तरुणीला सिंग यांच्या कंपनीत नेले आणि निघण्यापूर्वी पत्रकार विश्वकर्मा यांना माहिती दिली. त्यामुळे हा प्रकार बातमीच्या संकलनाकरिता आपल्या कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी ते ही त्याठिकाणी पोहोचले होते. तिथे कंपनी मालक व त्याच्या मुलाने या प्रकरणाबद्दल माफी मागितली. याशिवाय या काळात मालकाच्या मुलाने पैशांचे आमिषही दाखवले, त्यानंतर काही वेळाने तरुणीची नाहक बदनामी होऊ नये म्हणून हे प्रकरण शांत करण्यात आले, लेखी तक्रारीच्या आपल्या पात्रात असे नमूद करत पत्रकार विश्वकर्मा यांनी स्पष्ट केले आहे की, यावेळी संतोष यादव यांनी झाल्या प्रकाराची माहिती दिल्यानंतर श्रीनगर पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्याला घटनास्थळी पाचारण करण्यात आले होते. पत्रकार विश्वकर्मा हे यादरम्यान त्यांच्या इतर महत्त्वाच्या कामाच्या संदर्भात



तेथून निघून गेले होते आणि श्रीनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी राठोड व त्याच्या एका साथीदाराने घटनास्थळ गाठून याप्रकरणी तोडगा काढला.

पत्रकार चंद्रभूषण विश्वकर्मा यांनी आरोप केला आहे की, २१ डिसेंबर २०२१ रोजी कंपणी मालक सिंग व त्यांच्या मुलाने श्रीनगर पोलिसांच्या संगनमताने सदर तरुणी, तिची बहीण आणि इतर पाच जणांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३९५ अंतर्गत खोटा एफआयआर दाखल करून या सर्वांना सदर प्रकरणात अडकवले. या खोट्या प्रकरणात आपल्याला सातवा आरोपी बनवण्यात आल्याचे त्याने सांगितले आहे, तर त्यादिवशीची संपूर्ण घटना त्यांच्या कॅमेऱ्यात कैद झाली आहे. खोटा गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांनी या घटनेचे काही क्लिप्स त्यांच्या टीव्ही वाहिनीच्या सोशल मीडिया पेजवरही उघड केले आहेत.

# 'सीसीटीव्हीं'मुळे अनेक गुन्ह्यांचा लागला छडा



औरंगाबाद :स्मार्ट सिटी योजनेतून शहरात लावण्यात आलेल्या ७०० 'सीसीटीव्हीं'चा उपयोग पोलिस प्रशासनाला होत आहे. विविध गुन्ह्यांच्या तपासात यातून माहिती हाती लागत असून, याद्वारे गुन्हेगाराचा शोध घेणे सोपे जात आहे. आतापर्यंत विविध महत्त्वाच्या ४१ गुन्ह्यांत 'सीसीटीव्ही' फूटेज कामी आले आहे. औरंगाबाद शहरातील मुख्य रस्ते; तसेच महत्त्वाचे चौक या ठिकाणी स्मार्ट सिटीच्या मार्फत कॅमेरे बसविण्याची कार्यवाही करण्यात आली. औरंगाबाद उपआयुक्त परिमंडळ एक मध्ये ३१५ कॅमेरे लावण्यात आले असून, परिमंडळ दोन मध्ये ३८५ असे एकूण ७०० कॅमेरे लावण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांमध्ये महत्त्वाच्या भागातील घडामोडी टिपल्या जात आहेत. शहरात वाहनचोरीच्या प्रकारापासून विविध गुन्ह्यांमध्ये 'सीसीसी'रूमचे काम प्रभावी ठरत आहे. 'सीसीसी'रूममध्ये २४ तास कर्मचाऱ्यांची ड्युटी लावण्यात आली आहे. यामुळे अनेक घटनांची माहिती पोलिसांना थेट होत आहे.

मिसिंग प्रकरणात महत्त्वाची कामगिरी

शहरात घडलेल्या विविध गुन्ह्यांचा तपास करणारे अनेक तपासी अंमलदार 'सीसीसी'रूममध्ये माहिती घेण्यासाठी येत असतात. मात्र, घरातून रागाच्या भरात निघून गेलेल्या मुलांचीही माहिती घेण्यासाठी अनेक जण या सुविधेचा वापर करीत आहेत. या सुविधेमुळे अशा मुलांना ट्रॅक करण्याचे काम सोपे होते.

# गॅसच्या भडक्याने काचा फुटल्या, दरवाजा तुटला, 6 जण होरपळले!

नाशिकः गॅस लिकेज होऊन उडालेल्या भडक्यातील दोन घटनांमध्ये नाशिक जिल्ह्यात 6 जण भाजले आहेत. यातील पहिली घटना ही इगतपुरी येथे घडली असून, येथील दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. तर दुसरी घटना म्हसगण शेजारील जांभुळपाडा येथे घटली आहे. या घटनेमध्ये चार जण भाजले आहेत.

**गिझरमधून गळती**

इगतपुरी येथे मुनाफ शेख यांच्या घरी गॅस गिझर लावण्यात आले आहेच. मात्र, गिझरचा गॅस लिक झाला. घरातील मंडळींनी नेहमीप्रमाणे आंघोळीसाठी पाणी गरम करायला गॅस गिझर सुरू केला. मात्र, त्यामुळे आगीचा मोठा भडका उडाला. या घटनेत मुनाफ शेख भाजले गेले. त्यांनी आरडाओरडा सुरू केला. त्यानंतर त्यांचा आवाज ऐकूण त्यांचा मुलगा त्या दिशेने धावला. त्यामुळे तोही भाजला जावून जखमी झाला. मात्र, त्याने प्रसंगावधान राखत दरवाजा बंद केला. मात्र, गॅसचा भपका आणि जोर इतका होता की त्यामुळे बाथरूमच्या काचा फुटून बाहेर पडल्या. दरवाजाही तुटला. यातील जखमी मुलावर इगतपुरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर मुनाफ शेख हे जास्त भाजल्याने त्यांच्यावर नाशिक येथील नारायणी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.



मात्र, दोघांचीही प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

तपासणीवेळी भडका

गॅस भडक्याची दुसरी घटना नाशिकच्या पेठ तालुक्यातील जांभुळपाडा येथे घडली. या घटनेमध्ये चार जण भाजले आहेत. जांभुळपाडा येथे गॅस जोडणीची तपासणी करण्यासाठी कारागीर आले होते. त्यांनी गॅस व्हॉल्वमधून गॅसची गळती होते की नाही, हे तपासण्यासाठी काडी पेटवली. त्यामुळे गॅसने पेट झाला. त्यात घरातील चार व्यक्ती भाजल्या गेल्या. त्यांच्यावर सध्या पेठ येथील रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे समजते.

**वर्षात 13 मृत्यू**

नाशिक जिल्ह्यात गॅस गळतीमुळे वर्षभरात 13 जणांचा मृत्यू झाला आहे. एप्रिलमध्ये सारडा सर्कल येथील संजरीनगर सोसायटीत गॅस सिलिंडर बदलताना गळती झाली. या स्फोटात सात जणांचा मृत्यू झाला होता. वडाळा-पाथर्डी रस्त्यावरील भारतनगर झोपडपट्टीमध्ये सिलिंडरचा स्फोट होऊन पाच युवकांचा बळी गेला होता. तर चार सप्टेंबर रोजी एका हॉटेलमध्ये गॅस स्फोट झाल्याची घटना घडली होती. यात स्वयंपाकी रूपेश गायकवाड यांचा जागीच मृत्यू झाला होता. दरम्यान, नागरिकांनी दक्षता घेतली आणि काही नियम पाळले तर गॅस सिलिंडर गळतीचे अपघात रोखले जाऊ शकतात. त्यासाठी फक्त थोडी दक्षता घ्यावी लागेल.

# जैश-ए-मोहम्मदच्या संपर्कात असलेल्या रईसच्या नागपुरातील नेटवर्कचा शोध



नागपूरःजैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेच्या संपर्कात असलेला रईस अहमद शेख असादउल्ला शेख (वय २८ रा. अवंतीपुरा, जम्मू काश्मीर) याच्या नागपुरातील 'नेटवर्क'चा पोलिसांनी कसून शोध सुरू केला आहे. नागपुरात आल्यानंतर रईसला कोण मदत करणार होते, त्याला कोणत्या प्रकारची साधणे उपलब्ध करून देण्यात येणार होती, यासह त्याच्या वास्तव्यापासून ते परत जाण्यापर्यंतचा 'मिनिट टू मिनिट' तपास पोलिस करीत आहेत.जम्मू काश्मीर पोलिसांनी रईसला अटक केल्यानंतर रेशीमबागेतील स्मृती मंदिराचे मोबाइलद्वारे चित्रीकरण करण्यात आल्याचे उघड झाले. राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणांनी नागपूर पोलिसांशी संपर्क साधून याबाबत माहिती दिली. याची माहिती मिळताच गुन्हेशाखा व दहशतवाद विरोधी पथकातील अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक तत्काळ काश्मीरला गेले. संबंधित पोलिस व रईसकडून माहिती घेत पथक नागपुरात परतले. गुन्हेशाखा पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी तपासाला वेग दिला. रईस याला विमानतळावरून सीताबर्डीतील हॉटेलपर्यंत आणणाऱ्या ऑटोचालकाचाही पोलिस शोध घेत आहेत. यासह त्याला एका धर्मगुरूने ताबीज दिले. हा धर्मगुरू त्याला ओळखतो का? त्याने नेमके कशासाठी त्याला ताबीज दिले. या ताबीजमध्ये एखादा संदेश पाकव्याप्त काश्मिरातील लॉँचिंगपॅड ऑपरेशनल कमांडर ओमर याला पोहोचविण्यात येणार होता का? या सर्व बाबींचा छडा पोलिस लावणार आहेत. दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित चार ते पाच जणांची पोलिसांनी कसून चौकशी केली असून, यात हॉटेलचा व्यवस्थापक व नोकराचाही समावेश असल्याची माहिती आहे.

# परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक




जादा परताव्याचे आमिष दाखवून भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या तथाकथित उपशाखेत गुंतवणूक करायला सांगून महिलेची सात लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पर्वती येथे राहणाऱ्या ५५ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. त्यावरून दोन तरुणींसह एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी २०२१ रोजी ते तीन जुलै २०२१ या कालावधीत तक्रारदार महिलेच्या घरी दोन तरुणी आल्या होत्या. त्यांनी तक्रारदार आणि त्यांच्या सोबतच्या व्यक्तीचा विश्वास संपादित केला. आरोपी तरुणी काम करत असलेली 'एफएलएनएल' ही कंपनी 'एलआयसी'ची उपकंपनी असल्याचे भासवले. तक्रारदार महिलेने गुंतवणूक केल्यास चांगल्या परताव्याचे अमिष दाखवले. त्यानंतर त्यांनी तक्रारदार महिलेकडून सात लाख रुपये घेतले. त्यानंतर त्यांनी तक्रारदार महिलेला कुठलाही परतावा न देता, त्यांना पैसे देण्यास टाळाटाळ केली.

# महागड्या कार चोरणा-या टोळीचा पदार्फाश; म्होरक्याबद्दल झाला धक्कादायक खुलासा



कोल्हापूर : विविध राज्यांतून आलिशान चार चाकी वाहने चोरून ती विकणारी टोळी कोल्हापूर पोलिसांनी जेरबंद केली आहे. तसंच या टोळीकडून ५ कोटी रुपये किंमतीच्या ३१ अलिशान कार जप्त करण्यात आल्या आहे. अशा प्रकारची कारवाई मुंबईनंतर कोल्हापुरात प्रथमच झाली आहे.

देशपातळीवरचा गुन्हा उघडकीस आणल्याने पथकातील पोलिसांना ३५ हजार रुपयांचे बक्षीस पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी दिले. विशेष म्हणजे या टोळीचा प्रमुख आकाश देसाई हा कारागृहातून ही टोळी चालवत असल्याचं स्पष्ट झालं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देशपातळीवर आलिशान कार चोरणारी टोळी सक्रीय आहे. या टोळीचे धागेदोरे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे हवालदार रामचंद्र कोळी यांना मिळाले होते. त्यानुसार त्यांनी याबाबत पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांना माहिती दिली. त्यानुसार पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव यांनी अनेक पथके तयार करत या टोळीचा शोध घेतला. विविध ठिकाणी सापळा रचून त्यांनी जहीर अब्बास दुकानदार, यश देसाई, खलिदमहंमद सारवान यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सविस्तर चौकशी केली असता, त्यांनी विविध राज्यातून ३१ चारचाकी वाहन चोरल्याचं स्पष्ट झालं. चोरीची वाहने ते नंबर प्लेट, चेस नंबर बदलून विकत होते.

आकाश देसाई हा या टोळीचा प्रमुख आहे. तो बेळगाव येथील कारागृहात आहे. कारागृहात राहून तो टोळी चालवत होता. त्यालाही या गुन्ह्यात अटक केली जाणार आहे.दरम्यान, या टोळीचा पर्दाफाश करण्यासाठी उपनिरीक्षक शेष मोरे, असिफ कलायगार, सुरेश पाटील, विनोद कांबळे, अनिल जाधव, संजय पडवळ, अनिल पास्ते, संतोष पाटील, राजेंद्र वरंडेकर यांनी एक महिनाभर पाठपुरावा केला.

# ठाकरे सरकारमधील मंत्र्यानेच उडवला करोना नियमांचा फज्जा! गुन्हा दाखल



कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत विजयी उमेदवार राज्याचे आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर आणि त्यांच्या चारशे ते पाचशे कार्यकर्त्यांवर करोना नियमांचा भंग करून जंगी मिरवणूक काढल्याबद्दल जयसिंगपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.जिल्हा बँकेच्या शिरोळ सेवा संस्था गटात झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत मंत्री यड्रावकर यांनी शिरोळच्या दत्त सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष गणपतराव पाटील यांचा पराभव केला. त्याबद्दल शनिवारी जयसिंगपूर येथील क्रांती चौक गल्ली क्रमांक सहा दरम्यान यड्रावकरांची जंगी विजयी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत जेसीबीच्या सहाय्याने गुलालाची उधळण केली करोनाचे नियम डावलून मिरवणूक काढल्याबद्दल सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. त्यानंतर पोलिसांनी करोनाचे नियम डावलून मिरवणूक काढल्याप्रकरणी राज्यमंत्री यड्रावकर, त्यांचे बंधू व माजी उपनगराध्यक्ष संजय पाटील यड्रावकर, राहुल बंडगर, रोहित पाथरवट, विनायक गायकवाड, तेजस उपाध्ये, अभिनंदन देमापुरे, अक्षय परळीकर शुभम ऐतवडे, धीरज पाराज यांच्यासह सुमारे पाचशे कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल केला आहे.

# अंथरुणाला खिळलेल्या तरुण मुलाचा जीव घेतला, बहिणीच्या जबाबामुळे नराधम बाप गजाआड

दिल्ली : अर्धांगवायूमुळे अंथरुणाला खिळलेल्या मुलाची वडिलांनीच बेदम मारहाण करुन हत्या केली. राजधानी दिल्लीतील भारत नगर परिसरात ही हृदयद्रावक घटना घडल्याचं समोर आलं आहे. दिल्ली पोलिसांनी नराधम बापाला अटक केली आहे.

काय आहे प्रकरण?

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 9 जानेवारी रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास भारत नगर पोलीस ठाण्यातील दीप चंद बंधू रुग्णालयात परमजीत नावाच्या तरुणाला बेशुद्धावस्थेत दाखल करण्यात आल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले, त्यानंतर समजले की, बेशुद्धावस्थेत रुग्णालयात दाखल केलेल्या तरुणाला डॉक्टरांनी मृत घोषित केले आहे. यानंतर दिल्ली पोलिसांनी परमजीतचा मृतदेह शवविच्छेदनासाठी बीजेआरएम रुग्णालयात पाठवला.

बहिणीमुळे प्रकरणाचा उलगडा

परमजीतच्या बहिणीने सांगितले की, सकाळी ती घरी आली तेव्हा तिचा भाऊ परमजीत जखमी अवस्थेत बेडवर पडला होता.

रात्री उशिरा त्याचे वडील दारुच्या नशेत घरी आले. त्यांनी आपल्या भावाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याचे तिने सांगितले.

परमजीतच्या बहिणीने सांगितले




की, तिच्या भावाला गेल्या 14 वर्षांपासून अर्धांगवायू (पॅरालिसिस) झाला होता आणि तो बेडवर पडून होता. अशा परिस्थितीत वडिलांनी बेदम मारहाण केल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्याचा मृत्यू झाला.

वडिलांना अटक

परमजीतच्या बहिणीच्या जबाबाच्या आधारे दिल्लीतील भारत नगर पोलिस ठाण्यात आरोपी वडिलांविरुद्ध आयपीसी कलम 302 च्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एवढेच नाही तर दिल्ली पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी पित्याला अटक केली आहे. त्याचबरोबर या प्रकरणाचा अधिक तपास सुरु आहे.

# व्यापा-याची ८२ लाखांची फसवणूक

सुक्या मेव्याचा पुरवठादार असल्याचे भासवून एका भामट्याने एपीएमसी मार्केटमधील एका व्यापाऱ्याकडून तब्बल ८२ लाख रुपयांची खरेदी करून मालाची रक्कम न देता पलायन केल्याचे उघडकीस आले आहे. अनिल राजगुरूकर असे त्याचे नाव असून एपीएमसी पोलिसांनी त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. तक्रारदार अमृत ढवळे हे सुक्या मेव्याचे व्यापारी असून एपीएमसीतील मसाला मार्केटमध्ये रचना ट्रेडिंग कंपनीच्या माध्यमातून ते दीपक भोईर व सुनिलकुमार अग्रवाल यांच्यासह व्यवसाय करतात. दोन वर्षांपूर्वी अनिल राजगुरुकर याने मे. अक्षदा इंटरप्रायजेस या कंपनीचा प्रोप्रायटर असल्याचे भासवून मार्केटमधील दलाल कमलेश याच्या माध्यमातून ढवळे यांच्यासोबत ओळख करून



घेतली होती. त्यावेळी राजगुरुकर याने कंपनीचे कार्यालय कोपरखैरणे येथे असल्याचे सांगितले होते.

मार्च २०२० मध्ये राजगुरुकर याने ढवळे यांच्याकडून १५ लाख ४६ हजार रुपयांचा सुका मेवा घेऊन त्याची रक्कम तीन महिन्यांच्या कालावधीत दिली होते. त्यानंतरही आणखी एकदा मालाचे पैसे ऑनलाइन देऊन त्यांचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर राजगुरुकर याने जानेवारी ते मार्च २०२१ मध्ये ढवळे यांच्याकडून एकूण ८२ लाख १० हजारांचा माल घेतला. पैशांबाबत ढवळे यांनी विचारणा केली असता पैसे देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर त्याने फोन बंद करून पलायन केले. ढवळे यांनी राजगुरुकर याने दिलेल्या पत्त्यावर जाऊन पाहाणी केली असता अशी व्यक्ती तेथे राहत नसल्याचे समजले. त्यानंतर ढवळे यांनी एपीएमसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898